# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१४७** **दिनांक - १७/०४/२०२४**

## ' जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकुने पोटात भोसकुन प्राणघातक हल्ला करून फरार अज्ञात आरोपीत यांना २४ तासांचे आत जेरबंद करण्यास तुळींज गुन्हे प्रकटीककण पथकास यश'

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १५.०४.२०२४ रोजी रात्रौ ०२.१५ वा. च्या. सुमारास तुळींज ओव्हरब्रिजखाली भाजी मार्केट येथुन डाव्या बाजुच्या जिन्यावर नालासोपारा पुर्व या ठिकाणी फिर्यादी नामे गणेश महेश जैस्वाल वय ३० वर्षे रा. रुम नं. ०४ लाडक्या पंजी चाळ डिव्हाईन स्कुल जवळ काजुपाडा तुळींज रोड नालासोपारा पुर्व हे तुळींज ब्रिजखालील जिन्याने चढुन वरती जात असताना रस्त्यामध्ये बसल्याचे कारणावरुन वाद होवुन ०२ अनोळखी आरोपीत यांनी चाकुने वार करून जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न केलेवरुन फिर्यादी यांनी दिलेले तक्रारीवरुन आरोपीत यांचेविरुद्ध गुरनं. ३१७/२०२४ भादविस कलम ३०७,३२३,५०४,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांनी आरोपीत यांचा शोध घेवुन त्यांना तात्काळ अटक करणेबाबत आदेशित केले होते. नमुद गुन्ह्यातील आरोपीत यांचेबाबत फिर्यादी तसेच साक्षीदार यांना पुर्ण नाव व पत्ता माहित नव्हता. तसेच आरोपीत हे मोबाईल फोनचा वापर करित नसल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याने, आरोपीत याचा शोध घेत असताना अडचणी येत होत्या.आरोपीत यास अंमली पदार्थाचे सेवन करण्याची सवय असल्याने व तो नालासोपारा स्टेशन जवळील डंपिंग ग्राउंड तसेच झाडाझुडुपामध्ये राहत असल्याची गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने आरोपीचा सदर परिसरात शोध घेवुन आरोपीत क्र. ०१ यास ताब्यात घेतले. तसेच आरोपीत क्र. ०२ हा परराज्यात पळुन जाण्याच्या तयारीत असताना, त्यास त्याचे राहते परिसरातुन ताब्यात घेतले. दोन्ही आरोपीत यांना गुन्हा दाखल झाल्यापासुन अविरतपणे तपास करून, आरोपीत यांचेबाबत काही एक माहिती नसताना तसेच आरोपीत हे मोबाईल फोनचा वापर करित नसल्याने, ते ज्या ठिकाणी वास्तव्य करतात त्या संभाव्य ठिकांणांची माहिती प्राप्त करुन नाव पत्ता निष्पन्न करुन २४ तासांचे आत आरोपीत नामे, **१) राहुलकुमार शिवप्रकाश दुबे उर्फ पंडित रा. ९० फिट रोड प्रगतीनगर नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर.२) दिव्यांशु उर्फ टकला सुरेश यादव वय १९ वर्षे रा. कृष्मा चाळ वैतीवाडी आचोळे नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर** ताब्यात घेवुन त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, दोन्ही आरोपीत यांना दि. १७.०४.२०२४ रोजी अटक केली आहे.

आरोपीत क्र. ०१ हा सराईत अपराधी असुन त्याचेवर खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

१) माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजी.नं. ३४०/२०२१ भादवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे.

२) माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजी.नं. ३२५/२०२१ भादवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे.

३) वसई पोलीस ठाणे गु.रजी.नं. ३८७/२०२० भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री. उमेश माने- पाटील सहा. पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सुधिर चव्हाण, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/सुनिल पवार, पोउपनिरी/ बि.एस. बांदल, पो.हवा/०६०७१ आनंद मोरे, पोहवा/०७०९८ उमेश वरठा, पोहवा/१२०६२ केंद्रे, पोलीस अंमलदार- १४१५४ राहुल कदम यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक – श्री. जाधवर हे करीत आहेत.